# ठाणे महानगरपालिका, ठाणे

## शहर विकास विभाग

## केंद्रिय माहितीचा अधिकार - २००५

### कलम ४ (१) (ब) नुसार जाहिर प्रकटन

**अ) १ ) संस्थेच नांव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक, कार्य व सेवेचा तपशिल:-**

शहर विकास विभाग, चौथा मजला, महापालिका भवन, चंदनवाडी, पांचपाखाडी, ठाणे महानगरपालिका, ठाणे -४०० ६०२.

दूरध्वनी क्रमांक - २५३३१५९०, २५३३१७४७, Extn-४२१, ४२२

फॅक्स - ----.

**ब) १ ) रचना:-**




**२ ) केंद्रिय माहितीचा अधिकार २००५ बाबत:-**

- **माहिती अधिकारी:-** उपनगर अभियंता, ठामपा, ठाणे.

- **प्रथम अपिलीय अधिकारी:-** सहाय्यक संचालक नगर रचना, ठामपा, ठाणे.

**३ ) अधिकारी व कर्मचारी यांची सूची:-**

**शहर विकास विभागामध्ये खालीलप्रमाणे कर्मचारी कार्यरत आहेत.**

| अ. क्र. | पदाचे नांव | संख्या |
|---|---|---|
| १. | सहाय्यक संचालक नगर रचना | १ |
| २. | उपनगर अभियंता | १ |
| ३. | कार्यकारी अभियंता | ४ |
| ४. | उप अभियंता | ४ |
| ५. | इमारत निरीक्षक | १ |
| ६. | कनिष्ठ अभियंता | ४ |
| ७. | भूमापक | ९ |
| ८. | आरेखक | २ |
| ९. | अनुरेखक | ४ |
| १०. | कार्यालयीन अधिक्षक | ० |
| ११. | मराठी लघुटंकलेखक | १ |
| १२. | इंग्रजी लघुटंकलेखक | १ |
| १३. | ’अ’ वर्ग लिपिक | ३ |
| १४. | लिपिक | १० |
| १५. | दफ्तरदार | ३ |
| १५. | शिपाई | ५ |
| १६. | वाहन चालक | १ |
| १७. | रिक्षा चालक | ० |
| १८. | बिगारी | ३ |
| १९. | सफाई कामगार | ३ |

**४) शहर विकास विभागातील कामकाजाची पध्दत:-**

महाराष्ट्र प्रादेशीक नगर रचना अधिनियम १९६६ कलम अंतर्गत १५२/१, मुंनई प्रांत्तक महानगरपाल्लका अध्धनयम १९४९ चे कलम अंतर्गत ६९, विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. १६७ अन्वये मा. आयुक्त सो., ठाणे महानगरपालिका, ठाणे यांनी ठाणे शहरातील दाखल होणा-या विकास प्रस्तावास मंजूरी करीता सहाय्यक संचालक नगर रचना, उपनगर अभियंता, कार्यकारी अभियंता, ठामपा, ठाणे यांना विकास प्रस्ताव मंजुरीचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.

ठाणे महानगरपालिकेच्या हद्दि अंतर्गत दाखल विकास प्रस्तावांना शहर विकास विभागामार्फत खालीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबुन मंजूरी देण्यात येते.

- आरेखकामार्फत झोन दाखला घेऊन संबंधित जमिनमालक, कुलमुखत्यारपत्रधारक, वास्तुविशारद यांचे मार्फत विकास नियंत्रण नियमावलीत नमूद केलेल्या विहीत नमुन्यात प्रस्ताव दाखल करण्यात येतो.

- सदर प्रस्तावातील भूखंडाचे क्षेत्र, मालकीबाबतचे टायटल, अकृषिक आदेश, यु. एल. सी. व प्रत्यक्ष जागेवरील परिस्थिती इ. बाबत भूमापकाच्या स्तरावर छाननी होऊन, सदर प्रस्ताव उपअभियंता यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येतात.

- उप अभियंता यांचे स्तरावर संपूर्ण प्रस्तावाची ठाणे शहराकरीता मंजूर विकास नियंत्रण नियमावली, मंजूर विकास योजना ठाणे मधील प्रस्ताव व इतर शासकीय आदेश इ. बाबीच्या अनुषंगाने तांत्रिक छाननी करण्यात येऊन, सदर प्रस्ताव पुढील मंजूरीकरीता कार्यकारी अभियंता, शहर विकास विभाग, ठाणे यांचेकडे पाठविण्यात येतो.

- भूमापक व उपअभियंता यांनी केलेल्या छाननीची तपासणी कार्यकारी अभियंता यांच्या स्तरावर होऊन, सदरचा प्रस्ताव उपनगर अभियंता/सहाय्यक संचालक नगर रचना यांचेकडे पुढील मंजूरीकरीता पाठविण्यात येतात.

- भूखंडाचे निव्वळ क्षेत्र ०.४ हेक्टर असलेल्या भूखंडावरील प्रस्ताव मान्यतेचे अधिकार उपनगर अभियंता यांना प्रदान करण्यात आलेले आहेत. उपनगर अभियंता यांनी कार्यकारी अभियंता यांच्याकडुन दाखल झालेल्या प्रस्तावाचे अवलोकन करुन महाराष्ट्र प्रादेशीक नगर रचना अधिनियम १९६६ , मुंनई प्रांत्तक महानगरपाल्लका अध्धनयम १९४९, व ठाणे शहराकरीता मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीन्वये प्रस्ताव मंजूर करण्यात येतो. तसेच, सदर प्रस्तावा अंतर्गत जोता प्रमाणपत्र व वापर परवाना प्रमाणपत्र देण्याचा अधिकार उपनगर अभियंता यांचे स्तरावर मंजूर करण्यात येतात.

- भूखंडाचे निव्वळ क्षेत्र ०.४ हेक्टरपेक्षा जास्त व १.०० हेक्टरपर्यंतचे भूखंडावरील प्रस्ताव मान्यतेचे अधिकार सहाय्यक संचालक नगर रचना यांना प्रदान करण्यात आलेले आहेत. सहाय्यक संचालक नगर रचना यांनी कार्यकारी अभियंता यांच्याकडुन दाखल झालेल्या प्रस्तावाचे अवलोकन करुन महाराष्ट्र प्रादेशीक नगर रचना अधिनियम १९६६ , मुंनई प्रांत्तक महानगरपाल्लका अध्धनयम १९४९, व ठाणे शहराकरीता मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीन्वये प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

  १.०० हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्र असलेले प्रस्ताव पुढील मान्यतेकरीता सहाय्यक संचालक नगर रचना यांचे मार्फत मा. आयुक्त सो., ठामपा, ठाणे यांचेकडे मंजूरीकरीता पाठविण्यात येतात.

सदर प्रस्तावा अंतर्गत जोता प्रमाणपत्र व वापर परवाना प्रमाणपत्र देण्याचा अधिकार सहाय्यक संचालक नगर रचना यांचे स्तरावर मंजूर करण्यात येतात.

- सहाय्यक संचालक नगर रचना यांचे अधिपत्याखाली विकास योजना अंमलबजावणी करणे बाबत स्वतंत्र कक्ष असून, त्यांचे मार्फत विकास योजनेशी अनुषंगिक कार्यवाही, भू संपादन फेरबदल इत्यादीची कार्यवाही करता येते.

तसेच, टि. डी. आर. मोबदल्यात विकास योजनेतील आरक्षीत भूखंड/रस्त्याखालील क्षेत्र ताब्यात घेणेबाबत मा. आयुक्त सो., ठामपा, ठाणे यांचे मंजूरीने कार्यवाही करण्यात येते व अशा प्रकरणातील हस्तातंरणीय विकास हक्क प्रमाणपत्र महापालिका आयुक्त यांचे स्वाक्षरीने देण्यात येते.

**<u>५ ) शहर विकास विभागातील सामान्य प्रशासना बाबत:-</u>**

- सहाय्यक संचालक नगर रचना यांनी मुंबई प्रांत्तिक महानगरपाल्लिका अध्धिनयम १९४९ अंतर्गत विहीत केलेल्या जबाबदा-या पार पाडणे, खात्याचे धोरणात्मक निर्णय, नियोजन व खात्याच्या कामकाजावर नियंत्रण ठेवणे. तसेच, मा. आयुक्त सो., ठामपा, ठाणे यांनी वेळोवेळी नेमून दिलेले काम पहाणे.

- उपनगर अभियंता यांनी खात्यातील कर्मचा-यांवर देखरेख, नियंत्रण व त्यांना मार्गदर्शन करणे व विभागातील कर्मचा-यांना कामाचे वाटप करणे. तसेच, मा. आयुक्त सो., ठामपा, ठाणे यांनी वेळोवेळी नेमूद दिलेले काम पहाणे.

- कार्यकारी अभियंता यांनी त्यांचे अधिपत्याखाली कर्मचा-यांवर देखरेख करणे व त्यांना मार्गदर्शन करणे. कोर्ट केसेस बाबत पाठपुरावा करणे. प्रभाग समिती व स्थायी समितीच्या मिटींगना उपस्थित राहणे. नकाशाच्या/कागदपत्रांच्या सत्यप्रती व भाग नकाशे अदा करणे. लोकशाही दिना अंतर्गत, इतर प्राप्त तक्रारी व माहितीच्या अधिकारातील प्राप्त अर्जां बाबत विहीत मुदतीत पाठपुरावा करुन, प्रकरण निकाली काढणे.

**<u>६ ) कार्यालयीन अधिक्षक:-</u>**

- विभागातील कर्मचा-यांवर पर्यवेक्षण व नियंत्रण ठेवणे. विभागात प्राप्त होणारी कागदपत्रे, प्रकरणे, देयके संबंधीत कर्मचा-यांमध्ये लिपिकांमार्फत वाटप करणे. सहा बंडल पध्दतीने दफ्तराची तपासणी करणे. कर्मचा-यांच्या हजेरी पत्रकारवर नियंत्रण ठेवणे. सामान्य प्रशासनाची सर्व कामे अधिपत्याखालील कर्मचा-यांच्या रजा मंजूरीची शिफारस करणे.

सदरचे पद हे ब-याच कालावधीपासुन रिक्त आहे.

## ७ )शहर विकास विभागामार्फत मिळालेल्या उत्पन्ना बाबत:-

सन १९९९-२००० पासुन सन २००८-२००९ अखेर शहर विकास विभागाकडील उत्पन्नाचा तुलनात्मक तक्ता पुढीलप्रमाणे आहे.

| वर्ष | डि सी. रुल पुस्तिका विक्री | विकास शुल्क | इतर शुल्क | एकूण रुपये (करोड) |
|---|---|---|---|---|
| १९९९-२००० | २.४७ | १.१५ | ०.०१ | ३.६३ |
| २०००-२००१ | ६.४३ | ४.२२ | १.८६ | १२.५१ |
| २००१-२००२ | ५.५८ | ४.२७ | १.२५ | ११.१० |
| २००२-२००३ | १५.५८ | ७.५९ | ३.४४ | २६.६१ |
| २००३-२००४ | १२.८४ | ८.३३ | ५.९७ | २७.१४ |
| २००४-२००५ | १५.६९ | ११.३२ | ४.९८ | ३१.९९ |
| २००५-२००६ | २०.८५ | ५.२८ | ५.२८ | ३१.४१ |
| २००६-२००७ | ३८.५७ | ११.९८ | ७.४४ | ५७.९९ |
| २००७-२००८ | ६१.७६ | १३.२१ | ६.७८ | ८१.७५ |
| २००८-२००९ | ५३.३० | १०.२२ | १०.८५ | ७४.३७ |

## ८ ) भूसंपादनाबाबतचा तुलनात्मक तक्ता:-

सन १९८२ - २००६ पासुन ते सन २००६-२००९ अखेर भू संपादनाबाबतचा तुलनात्मक तक्ता व सद्यस्थिती पुढीलप्रमाणे.

| वर्षे | १९८२ ते २००६ | २००६ ते २००९ | | | | एकूण क्षेत्रफळ हेक्टर |
|---|---|---|---|---|---|---|
| संस्था | | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | एकूण | |
| भू संपादन कायद्यानुसार | - | - | ०.९४ | - | ०.९४ | ०.९४ |
| शासनामार्फत | १९.९३ | - | १०.५३ | - | १०.५३ | ३०.४६ |
| विकास हस्तांतर प्रमाणपत्र (T.D.R.) | २६.५६ | ५.२० | १४.३७ | १४.३१ | ३३.८८ | ६०.४४ |
| विकास हस्तांतर (D.R.) | २१.६० | ०.०९३ | ०.९४ | - | १.८७ | २३.४७ |
| **एकूण** | **६८.०९** | **६.१३** | **२६.७८** | **१४.३१** | **४७.२२** | **११५.३१** |

## ९ ) आरक्षण संपादनाचा तुलनात्मक तक्ता:-

सन १९८२ - २००६ पासुन ते सन २००६-२००९ अखेर आरक्षण संपादनाबाबतचा तुलनात्मक तक्ता व सद्यस्थिती पुढीलप्रमाणे.

| वर्षे | १९८२ ते २००६ | | २००६ -२००९ | | | | | | | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | २००६-०७ | | २००७-०८ | | २००८-०९ | | एकूण | | | |
| विभाग | नं. | क्षेत्र | नं. | क्षेत्र | नं. | क्षेत्र | नं. | क्षेत्र | नं. | क्षेत्र | नं. | क्षेत्र |
| शैक्षणिक | ३ | ०.७० | १ | ०.८२ | ४ | १.६५ | ४ | ०.९४ | ९ | ३.४१ | १२ | ४.११ |
| आरोग्य | - | - | - | - | - | - | २ | ०.४८ | २ | ०.४८ | २ | ०.४८ |
| म्युन्सिपल | १ | ०.३६ | - | - | १ | ०.३० | - | - | १ | ०.३० | २ | ०.६६ |
| पी.जी./आर.जी./मोकळया जागा/गार्डन | १२ | १४.१२ | १ | १.४६ | ५ | ४.७६ | ६ | ७.८८ | १२ | १४.१० | २४ | २८.२२ |
| सामुदायिक मार्केट | - | - | १ | ०.०४ | - | - | २ | ०.४३ | ३ | ०.४७ | ३ | ०.४७ |
| हाऊसिंग | - | - | - | - | १ | १.०५ | १ | ०.५० | २ | १.५५ | २ | १.५५ |
| इतर | - | - | - | - | - | - | १ | ०.४१ | १ | ०.४१ | १ | ०.४१ |
| **एकूण** | **१६** | **१५.१८** | **३** | **२.३२** | **११** | **७.७६** | **१६** | **१०.६४** | **३०** | **२०.७२** | **४६** | **३५.९०** |

**१० ) विकास योजनेतील रस्त्या अंतर्गत क्षेत्र संपादनाचा तुलनात्मक तक्ता:-**

सन १९८२ - २००६ पासुन ते सन २००६-२००९ अखेर विकास योजनेतील रस्त्या अंतर्गत क्षेत्र संपादनाबाबतचा तुलनात्मक तक्ता व सद्यस्थिती पुढील प्रमाणे.

| **वर्षे** | **१९८२ ते २००६** | **२००६ ते २००९** | | | | **एकूण क्षेत्रफळ हेक्टर** |
|---|---|---|---|---|---|---|
| संस्था | | **२००६-०७** | **२००७-०८** | **२००८-०९** | **एकूण** | |
| भू संपादन कायद्यानुसार | - | - | ०.९४ | - | ०.९४ | ०.९४ |
| टि. डी. आर. | ११.३८ | २.८९ | ६.६१ | ३.६८ | १३.१८ | २४.५६ |
| **एकूण** | **११.३८** | **२.८९** | **७.५५** | **३.६८** | **१४.१२** | **२५.५०** |

## **११ ) शहर विकास विभागामार्फत केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबाबत:-**

- सन ९७ - २००० या कालावधीत तत्कालीन मा. आयुक्त सो., ठामपा, ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली एकात्मिक रस्तारुंदीकरणा अंतर्गत रस्ता रुंदी रेषेचे सिमांकन देणे व रस्ता रुंदीकरणा अंतर्गत बाधीत झालेल्या विस्थापितांचे मा.महासभेच्या धोरणात्मक निर्णयानुसार मानवतेच्या भावनेतुन पुनर्वसन करणे.

- औद्योगिक ते रहिवास (आय. टु. आर.) प्रस्तावा अंतर्गत सुविधा भूखंड पाण्याच्या टाकीकरीता उपलब्ध करुन देणे.

- १ जानेवारी २००८ पासुन शहर विकास विभागात दाखल प्रस्तावाची छाननी मे. सॉफ्टेक यांनी तयार केलेल्या बिल्डींग प्लान अॅप्रुव्हल सॉफ्टवेअर (B. P. M. S.) व ऑटो डी. सी. आर. पध्दतीने छाननी करणे बाबतची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. त्यानुसार मागील वर्षी सदर सिस्टिमद्वारे एकूण १३५ प्रस्ताव दाखल झालेले आहे. या सिस्टिममुळे मानवी चूक व छाननी करीता लागणारा कालावधी कमी झालेला आहे.

- **अॅसेट रजिस्टर:-** शहर विकास विभागामार्फत विकास योजने अंतर्गत संपादीत केलेले आरक्षण रस्ते, सुविधा भूखंड, Recrational Ground (आर. जी.) इत्यादी संपादित करण्यात येतात. सदर संपादित केलेल्या भूखंडाची माहिती व्यवस्थित विहीत नमुन्यात वेळोवेळी जतन करुन ठेवण्याच्या दृष्टिने शहर विकास विभागाने अॅसेट रजिस्टर सॉफ्टवेअरच्या मदतीने तयार केलेले आहे.

- **NUIS(National Urban Information System):-** NUIS हा कार्यक्रम केंद्र शासनाने तयार केलेला आहे. केंद्र शासनाने दिलेल्या मार्गदर्शन तत्वानुसार इकडील विभागाने माहिती तयार केलेली आहे. ठाणे शहर व विविध विभागातील स्टॅटेस्टिक्स बाबतची माहिती त्यात अंतर्भूत आहे. सदरची माहिती शहराच्या भविष्यातील नियोजन व विकासाबाबत उपयुक्त आहे.

- **उपग्रहीय छायाचित्र व बेस मॅप तयार करणे बाबत:-** सन २००८ च्या उपग्रहीय छायाचित्राकरीता M. R. S. A. C. Hydrabad यांना आदेश देण्यात आलेले आहे. शहराचा बेस मॅप M. R. S. A. C. Nagpur यांनी तयार केलेला आहे. त्यामुळे आपणांस शहरातील महत्वाचे रस्ते, मुख्य ठिकाणे व झोपडपट्टी यांचे लेअर त्यात अंतर्भूत करण्यात आलेले आहेत.

- **सिटी मॅपः-** यापुर्वी इकडील विभागात सेक्टर नुसार डि. पी. शिटस् उपलब्ध होत्या. तथापि, मा. आयुक्त सो., ठामपा, ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली इकडील विभागाने शहराचा एकत्रित नकाशा तयार केलेला आहे.

- **सिटी सर्व्हेः-** ठाणे नगर परिषदेत ३२ गांवे एकत्रीत करुन, ठाणे महानगरपालिका स्थापन झाली. ठाणे महानगरपालिकेने सदर ३२ गावांचा सिटी सर्व्हे करण्याचे काम सुरु केलेले आहे.

# ठाणे महानगरपालिका, ठाणे

**महानगरपालिका भवन, डॉ. अल्मेडा रोड, चंदनवाडी, पांचपाखाडी, ठाणे - ४०० ६०२.**

**THE MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE**

====================================================================================

संदर्भ क्र. ठामपा/शविवि/ दिनांकः-

प्रति,
नागरी सुविधा केंद्र प्रमुख,
ठाणे महानगरपालिका, ठाणे

विषयः- केंद्रिय माहितीचा अधिकार २००५ कलम ४ (१) (ब) नुसार जाहिर प्रकटन.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने शहर विकास विभागाची माहिती, सोबत सॉफ्ट कॉपी व हार्ड कॉपी स्वरुपात जोडण्यात आलेली आहे. तरी, सदरची माहिती ठाणे महानगरपालिकेच्या वेब साईटला जोडणेत यावी.

आपला,

सहाय्यक संचालक नगर रचना,
ठाणे महानगरपालिका, ठाणे

प्रतः- माहितीसाठी सादर,
१) मा. अतिरिक्त आयुक्त, ठामपा, ठाणे
२) मा. उपायुक्त (मु.), ठामपा, ठाणे
३) उपनगर अभियंता, शहर विकास विभाग, ठामपा, ठाणे
४) जनसंपर्क अधिकारी, ठामपा, ठाणे.

## ❖ भूसंपादनाबाबतचा तुलनात्मक तक्ता:-

| वर्षे | १९८२ ते २००६ | २००६ ते २००९ | | | | एकूण क्षेत्रफळ हेक्टर |
|---|---|---|---|---|---|---|
| संस्था | | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | एकूण | |
| भू संपादन कायद्यानुसार | - | - | ०.९४ | - | ०.९४ | ०.९४ |
| शासनामार्फत | १९.९३ | - | १०.५३ | - | १०.५३ | ३०.४६ |
| विकास हस्तांतर प्रमाणपत्र (T.D.R.) | २६.५६ | ५.२० | १४.३७ | १४.३१ | ३३.८८ | ६०.४४ |
| विकास हस्तांतर (D.R.) | २१.६० | ०.०९३ | ०.९४ | - | १.८७ | २३.४७ |
| **एकूण** | **६८.०९** | **६.१३** | **२६.७८** | **१४.३१** | **४७.२२** | **११५.३१** |

## ❖ आरक्षण ताब्यात घेतल्याबाबतचा संक्षिप्त तक्ता:-

| वर्षे | १९८२ ते २००६ | | २००६ -२००९ | | | | | | | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | २००६-०७ | | २००७-०८ | | २००८-०९ | | एकूण | | | |
| **विभाग** | **नं.** | **क्षेत्र** | **नं.** | **क्षेत्र** | **नं.** | **क्षेत्र** | **नं.** | **क्षेत्र** | **नं.** | **क्षेत्र** | **नं.** | **क्षेत्र** |
| शैक्षणिक | ३ | ०.७० | १ | ०.८२ | ४ | १.६५ | ४ | ०.९४ | ९ | ३.४१ | १२ | ४.११ |
| आरोग्य | - | - | - | - | - | - | २ | ०.४८ | २ | ०.४८ | २ | ०.४८ |
| म्युन्सिपल | १ | ०.३६ | - | - | १ | ०.३० | - | - | १ | ०.३० | २ | ०.६६ |
| पी.जी./आर. जी./मोकळया जागा/गार्डन | १२ | १४.१२ | १ | १.४६ | ५ | ४.७६ | ६ | ७.८८ | १२ | १४.१० | २४ | २८.२२ |
| सामुदायिक मार्केट | - | - | १ | ०.०४ | - | - | २ | ०.४३ | ३ | ०.४७ | ३ | ०.४७ |
| हाऊसिंग | - | - | - | - | १ | १.०५ | १ | ०.५० | २ | १.५५ | २ | १.५५ |
| इतर | - | - | - | - | - | - | १ | ०.४१ | १ | ०.४१ | १ | ०.४१ |
| **एकूण** | **१६** | **१५.१८** | **३** | **२.३२** | **११** | **७.७६** | **१६** | **१०.६४** | **३०** | **२०.७२** | **४६** | **३५.९०** |

## ❖ विकास योजनेतील रस्त्याचे संपादनाबाबत:-

| वर्षे | १९८२ ते २००६ | २००६ ते २००९ | | | | एकूण क्षेत्रफळ हेक्टर |
|---|---|---|---|---|---|---|
| संस्था | | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | एकूण | |
| भू संपादन कायद्यानुसार | - | - | ०.९४ | - | ०.९४ | ०.९४ |
| टि. डी. आर. | ११.३८ | २.८९ | ६.६१ | ३.६८ | १३.१८ | २४.५६ |
| **एकूण** | **११.३८** | **२.८९** | **७.५५** | **३.६८** | **१४.१२** | **२५.५०** |

**कर्मचारी निहाय जॉब चार्ट:-**

**अधिकारी/कर्मचारी यांचे कार्ये/कर्तव्ये दर्शविणारा तक्ता**

| अ. क्र. | विभागांतर्गत कार्यरत असलेली पदे व पदावर कार्यरत कर्मचारी/अधिकारी | पदनिहाय कार्ये/कर्तव्ये |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १. | सहाय्यक संचालक नगर रचना | १०,००० चौ. मी. क्षेत्रापेक्षा जास्त विकास प्रस्ताव मंजूर करणे. मुंबई प्रांन्तिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम विहीत केलेल्या जबाबदा-या पार पाडणे. खात्याचे धोरणात्मक निर्णय, नियोजन व खात्याच्या कामकाजावर नियंत्रण ठेवणे व कर्मचा-यांना मार्गदर्शन करणे. |
| २. | उपनगर अभियंता | खात्यातील कर्मचा-यांवर देखरेख, नियंत्रण व त्यांना मार्गदर्शन करणे. अधिपत्याखालील कर्मचा-यांना कामाचे वाटप करणे. |
| ३. | कार्यकारी अभियंता | |
| ४. | उप अभियंता | दाखल प्रस्तावाची तांत्रिक छाननी करणे व त्यानुसार प्रस्ताव पुढील मंजूरीकरीता कार्यकारी अभियंता यांचेकडे पाठविणे. विकास प्रस्ताव अंतर्गत वाढीव बांधकामास महाराष्ट्र प्रादेशीक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम अन्वये नोटीस तयार करुन कार्यकारी अभियंता यांच्याकडे |
| ५. | इमारत निरीक्षक | |
| ६. | कनिष्ठ अभियंता | इमारतीचे जोत्याच्या बांधकामाची मोजमापे तपासुन, अहवाल देणे. माहितीच्या अंतर्गत विचारणा केलेल्या प्रश्नांचे उत्तर उपअभियंता व भूमापक यांचेशी संवाद तयार करणे. |
| ७. | भूमापक | विभागात दाखल केलेल्या प्रस्तावातील ७/१२ उतारे, पी. आर. कार्ड नुसार व मोजणी नकाशानुसार भूखंडाच्या क्षेत्राची व मालकी बाबत छाननी करुन प्रस्ताव उपअभियंताकडे तांत्रिक छाननीकरता पाठविणे.<br>जोता प्रमाणपत्राच्या वेळेस मोकळया जागेबाबत अहवाल देणे. रस्त्याखालील क्षेत्राचे, ॲमिनिटी ओपन स्पेस, आरक्षणाचे क्षेत्राचे मंजूर नकाशानुसार ताबा घेणे.<br>रस्तारुंदी रेषेचे सिमांकन करणे, प्रस्तावा अंतर्गत दाखल तक्रारीच्या अनुषंगाने अहवाल देणे. |
| ८. | आरेखक | |
| ९. | अनुरेखक | |
| १०. | कार्यालयीन अधिक्षक | |
| ११. | मराठी लघुटंकलेखक | |
| १२. | इंग्रजी लघुटंकलेखक | |
| १३. | 'अ' वर्ग लिपिक | |
| १४. | लिपिक | |
| १५. | शिपाई | |
| १६. | वाहन चालक | |
| १७. | रिक्षा चालक | |
| १८. | बिगारी | |

| | | |
|---|---|---|
| १९. | सफाई कामगार | |